**ठळक बातम्या**

- जागतिक हवाई वाहतूक क्षेत्रात भारतीय पुरवठादारांचा मोठा वाटा असावा या दृष्टीने सरकार प्रयत्नशील असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांच प्रतिपादन

- कुख्यात गुंड अबू सालेम याच्या सुटकेची याचिका सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली

- फिलिपिन्समध्ये फेरीबोटीला आग लागून ५ जणांचा मृत्यू, तर ८६ जण बेपत्ता

**आणि**

- महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत उपांत्य फेरीतला पहिला सामना भारत आणि बांग्लादेश यांच्यात होणार

**<><><><><>**

भारतीय हवाई वाहतूक क्षेत्र सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी मोठ्या संधी उपलब्ध करत असून, जागतिक हवाई वाहतूक क्षेत्रात भारतीय पुरवठादारांचा मोठा वाटा असावा, या दृष्टीने प्रयत्न सुरु असल्याचं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत 'सीआयआय' या उद्योग संघटनेनं आयोजित केलेल्या परिषदेत बोलत होते. भारत हे केवळ हवाई वाहतूक साधनांचे सुटे भाग जुळवण्याचं ठिकाण न राहता, त्या भागांची रचना, प्रमाणीकरण आणि निर्मितीचं केंद्र बनू शकतं असं ते यावेळी म्हणाले. भारताच्या विमान वाहतूक क्षेत्रात जागतिक हवाई वाहतूक कंपन्यांना मोठा रस असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी काल मलेशिया, तिमोर लेटे आणि म्यानमार इथल्या कृषीमंत्र्यांसह संयुक्त उच्चस्तरीय बैठकघेतली. भारत आणि मलोशिया यांच्यात शेतीसंबधी ज्ञान सामायिक करणे, संयुक्त कृषी संशोधन यावर या बैठकीत चर्चा झाली. म्यानमारच्या कृषीमंत्र्यांनी भारत म्यानमार या दोन्ही देशांमधल्या कृषी आणि कृषीसंबधित क्षेत्रांमधल्या सहकार्य यासाठीचा सामंजस्य करारावरची बौलणी पुढच्या टप्प्यात असल्याचं या बैठकीत सांगितलं.

<><><><><>

जपान वायूसेनेच्या लढाऊ विमानांची भारत भेट ही भारत जपान संरक्षण भागीदारीतला मैलाचा दगड आहे असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. या दोन्ही देशांचा परस्परांपरचा विश्वास तसेच भारत-प्रशांत प्रदेशातली शांतता आणि स्थैर्य यासाठी दोन्ही देश कटीबद्ध असल्याचं या भेटीतून प्रतित होत असल्याचं सिंग यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. भारत आणि जपान देशांचा ‘वीर गार्डियन २०२६’ संयुक्त सराव काल जोधपूर इथं सुरू झाला. हा सराव दोन आठवडे चालणार आहे.

<><><><><>

पोर्तुगालने भारताच्या ताब्यात दिलेला कुख्यात गुंड अबू सालेम याची सुटकेची याचिका सर्वोच्च न्यायालयानं आज फेटाळली. प्रत्यार्पणाच्या अटींनुसार आपण भारतात २५ वर्षं तुरुंगवासाची शिक्षा भोगली असून, आपली सुटका करावी, असं याचिकेत म्हटलं आहे.

त्यावर निर्णय देताना न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या पीठानं सालेम याची तात्काळ सुटकेची मागणी करणारी याचिका अकाली आणि गैरसमजावर आधारित असल्याचं नमूद करून, मुंबई उच्च न्यायालयाचा गेल्या एप्रिल महिन्यातला आदेश कायम ठेवला.

मुंबईत १९९३मध्ये झालेल्या साखळी बॉम्बस्फोट प्रकरणी दोषी ठरलेल्या सालेम याचं प्रदीर्घ कायदेशीर लढ्यानंतर ११ नोव्हेंबर २००५ रोजी पोर्तुगालहून भारताकडे प्रत्यार्पण झालं होतं. सालेम याला फाशीची शिक्षा दिली जाणार नाही, तसंच त्याचा तुरुंगवास २५ वर्षांपेक्षा जास्त नसेल असं प्रत्यार्पणाच्या अटीत नमूद करण्यात आलं होतं.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाची गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा आता ३ जानेवारी २०२७ रोजी होणार आहे. यापूर्वी ही परीक्षा २५ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार होती. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने काल ही माहिती दिली. गट क मध्ये लिपिक, टंकलेखक, ग्राम महसूल अधिकारी, कर सहाय्यक अशा विविध पदांसाठी एकंदर १२ लाख अर्ज आले आहेत. दरम्यान, एमपीएससीच्या परीक्षा प्रक्रियेतल्या कथित गैरप्रकारांविरोधात काल नाशिकमध्ये आंदोलन झालं. यावेळी विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना १८ मागण्यांचं निवेदन सादर केलं.

<><><><><>

गुजरातमध्ये गांधीनगरमध्ये बांधकाम सुरु असलेल्या जागी धातूचा स्लॅब कोसळून बारा जण जखमी झाले. कुडासन भागात काल रात्री ९ वाजेच्या दरम्यान ही दुर्घटना घडली. बांधकाम सुरु असताना हा स्लॅब तुटून कोसळला आणि त्याखाली १५ जण दबले गेले. त्यांच्यापैकी सर्वांना बाहेर काढलं असून त्यातल्या जखमी असलेल्या १५ जणांपैकी तिघा जणांना किरकोळ उपचारानंतर सोडण्यात आलं तर इतर १२ जणांवर उपचार सुरु आहेत. गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी नंतर अपघातस्थळाला भेट दिली. महानगरपालिका, राज्य आपत्कालीन प्रतिसाद दल आणि राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद दल या सर्वांनी अपघातस्थळी दुर्घटनाग्रस्तांच्या सुटकेसाठी सहाय्य केल्याचं त्यांनी सांगितलं. सुटका आणि बचाव दल अपघातस्थळावरचा ढिगारा साफ करुन कोणीही बांधकामाखाली दबलं गेलं नसल्याची खातरजमा करुन घेत आहे.

<><><><><>

बिहारमधल्या १४ जिल्ह्यांमधले ४० लाखापेक्षा जास्त नागरिक पुरामुळे बाधित झाले आहेत. गेले ५ दिवस पडत असलेल्या संततधार पावसामुळे गंगा, गंडक, कोसी, बुर्ही गंडक, पुनपुन, बागमती या नद्या विविध ठिकाणी धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. पाटणा, भोजपूर, सारण, वैशाली, भागलपूर आणि बेगुसराय या जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. नेपाळमध्ये पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळेही अनेक ठिकाणी नद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत असल्याचं सरकारी सूत्रांनी सांगितलं.

राज्यातल्या पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तातडीच्या मदत आणि बचाव कार्यासाठी विविध जिल्ह्यांमध्ये SDRF ची २७ आणि NDRF ची १० पथकं तैनात करण्यात आल्याचं संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

नेपाळमधल्या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर भारताने मदतकार्य सुरु ठेवलं असून, आतापर्यंत १३० टनांपेक्षा जास्त मदतसाहित्य नेपाळमध्ये पाठवलं आहे, तसंच शोध, बचाव आणि न्यायवैद्यक कार्यवाहीसाठी ५४ तज्ज्ञ कर्मचारी तैनात केले आहेत. भारतीय हवाईदलाचं आठवं विमान ३५ टन मदत साहित्य घेऊन काठमांडू इथं पोहोचल्याचं नेपाळमधल्या भारतीय दूतावासानं सांगितलं.

भारताचं बोगद्यांमधल्या बचाव कार्यातलं तज्ज्ञ पथक आणि नेपाळचं लष्कर यांनी चिलीमे आणि लांगतांग  इथं बचाव मोहीम हाती घेतली आहे. अवजड यंत्रसामग्री थेट बोगद्याच्या प्रवेशद्वारापर्यंत नेण्यासाठी तात्पुरता मार्ग तयार करण्याचं काम वेगाने सुरू असून, ते दोन ते तीन दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा असल्याचं स्थानिक सूत्रांनी सांगितलं.

<><><><>

फिलिपिन्समध्ये पालावान प्रांताजवळच्या समुद्रात एका फेरीबोटीला आग लागल्याने ५ जणांचा मृत्यू झाला तर ८६ जण बेपत्ता आहेत. फिलिपिन्सच्या तटरक्षक दलाने दिलेल्या माहितीनुसार, एमव्ही जून ॲस्टर ही फेरीबोट या परिसरातल्या कोरोन या प्रसिद्ध पर्यटनस्थळावर पोहोचत असताना वाटेत तिला आग लागली. या जहाजावर १४३ जण होते. आगीतून ४३ जणांची सुटका करण्यात आली आहे.

<><><><>

चीनच्या आग्नेय भागातल्या जिआंग्शी प्रांतात दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये मृतांची संख्या १६ वर पोहोचली आहे. इथल्या सुईचुआन काउंटी भागात गेले काही दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे तसंच सौडेल चक्रीवादळाने धडक दिल्यामुळे दरड कोसळण्याच्या घटना घडत आहेत. सुईचुआन काउंटीमधून १८ हजारांहून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे.

<><><><>

दुबई इथं सुरु असलेल्या महिलांच्या आशिया चषक टी-ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज उपांत्य फेरीतला पहिला सामना भारत आणि बांग्लादेश यांच्यात होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरु होईल. साखळी फेरीतील सर्व सामने जिंकून भारतानं गटात अव्वल स्थान पटकावलं आहे.

<><><><>

महिलांच्या कनिष्ठ आशियाई कप हॉकी स्पर्धेत भारताच्या संघानं आज पाकिस्तानच्या संघाचा १९-० असा धुव्वा उडवला आणि उपांत्य फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत दक्षिण कोरिया किंवा मलेशिया यांच्यातल्या विजेत्या संघाशी भारताचा पुढचा सामना होईल.

//<><><><>//